


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८७ वा दि १० जून २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भाजपचा अधिकृत उमेदवार रिंगणात, तरी बंडखोर अपक्षाचा अर्ज कायम, भंडाऱ्यात पक्षाची चर्चा

**वृत्तसंस्था भंडारा**

भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप, काँग्रेससमर्थित आणि अपक्ष अशा तीन उमेदवारांमध्ये लढत होत आहे. वरवर पाहता ही निवडणूक भाजपसाठी सुकर ठरणार असल्याचे दिसून येत आहे. मात्र भाजपचाच एक उमेदवार अपक्ष लढत देत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चा वाढल्या आहेत. भाजपचा अधिकृत उमेदवार रिंगणात असताना त्याच पक्षाचा दुसरा उमेदवार निवडणुकीत कशापायी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भाजप शहराध्यक्षच अपक्ष रिंगणात भंडारा-गोंदिया विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीने अविनाश ब्राह्मणकर यांना संधी दिली आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शप), शिवसेना (उबाठा) या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराने माघार घेतल्याने काँग्रेसने अपक्ष उमेदवार नरेश ईश्वरकर यांना पाठिंबा देत त्यांना निवडणूक रिंगणात उतरविले आहे. याशिवाय तिसरे उमेदवार सचिन कुंभलकर हे अपक्ष आहेत. कुंभलकर हे भाजपचे शहराध्यक्ष तथा भंडारा नगर परिषदेचे स्वीकृत सदस्य आहेत. ४ जून रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याची मुदत होती. नामांकन दाखल करणाऱ्या अनेकांनी त्यादिवशी अर्ज मागे घेतले. परंतु, कुंभलकर हे निवडणुकीत कायम राहिल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कुंभलकर यांना निवडणुकीत अपक्ष म्हणून ठाम राहण्यासाठी पक्षाकडूनच सांगण्यात आले होते. त्यामुळेच त्यांनी अर्ज मागे घेतले नाही. परंतु, पक्षाचा अधिकृत उमेदवार असताना भाजपने आखलेला हा ङ्कप्लान बीफ चर्चेचा विषय ठरू लागला आहे. भंडारा-गोंदिया विधान परिषदेसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. काँग्रेसचा अधिकृत उमेदवार नसल्याने भाजपचे ब्राह्मणकर यांच्यासाठी ही बाब सोयीची ठरणार आहे. मात्र पक्षातीलच कुंभलकर अपक्ष असल्याने चिंता कायम आहे.



भाजपचे अधिकृत उमेदवार अविनाश ब्राह्मणकर हे आधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात होते. त्यांनी काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपदही भूषविले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ऐनवेळी त्यांनी राष्ट्रवादीतून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांना भाजपची उमेदवारी मिळाली. त्यामुळे भाजपचे कार्यकर्ते नाराज झाले. निवडणुकीत काँग्रेस नेते नाना पटोले यांच्याविरोधात त्यांचा पराभव झाला. आता पक्षाने त्यांना पुन्हा विधान परिषदेत संधी दिली आहे. त्यामुळे भाजपमधील मूळ कार्यकर्ते नाराज झाल्याचीही चर्चा आहे.

# बँक निवडणुकीत मुलाचा अर्ज बाद; मुख्यमंत्र्यांचं नाव घेत अब्दुल सत्तारांचं मोठं वक्तव्य, पुढील दिशा स्पष्ट

**वृत्तसंस्था छत्रपती संभाजीनगर**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माझ्या मुलाचा उमेदवारी अर्ज ज्या कारणावरून रद्द करण्यात आला आहे, त्या संपूर्ण संशयास्पद प्रकाराची माहिती मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः कायदेतज्ज्ञ आणि अ ॅडव्होकेट आहेत, त्यामुळे त्यांना या प्रकरणाते झालेली घोडचूक समजायला दोन मिनिटेही लागणार नाहीत, असा ठाम विश्वास शिवसेनेचे नेते आणि आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला आहे. अब्दुल सत्तार यांनी मुंबईत आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना बँकेच्या छाननी प्रक्रियेवर कायदेशीर आक्षेप घेतले. ते म्हणाले, बँकेने ज्या नियम ५७ चा दाखला देऊन फॉर्म रद्द केला आहे, त्यात अशी कोणतीही तरतूद नाही. एखादी व्यक्ती बँकेचा सदस्य झाल्यानंतर पदाचा गैरफायदा घेत असेल, तरच हा नियम लागू होतो. माझा मुलगा तर अजून केवळ उमेदवार आहे. हा कायदेशीर पेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडणार आहे. ते वकील असल्याने या प्रकरणाचा गाभा आणि त्यातील बेकायदेशीरपणा त्यांना तातडीने लक्षात येईल आणि तिथे आम्हाला निश्चित न्याय मिळेल.ङ्कङ्घजिल्हा बँकेला आमच्या कुटुंबाने इमारत भाड्याने दिली आहे, हे खरे आहे. मात्र, निवडणूक लढवण्याचे ठरताच मुलाने बँक खाली करण्याची कायदेशीर नोटीस प्रशासनाला दिली होती. उलट, सध्या शेतकऱ्यांना कर्ज वाटप सुरू असल्याने सध्या बँक खाली करू शकत नाही असं म्हणत बँकेनेच आमच्याकडे इमारत खाली करण्यासाठी वेळ मागून घेतला होता. मग आता आमच्यावरच कारवाई कशी होऊ शकते? हीच वस्तुस्थिती मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमोर ठेवणार आहे, असे सत्तार यांनी स्पष्ट केले. सत्तार यांनी विरोधकांना आणि बँक प्रशासनाला सुनावताना सांगितले की, बँकेने दिलेला निर्णय हा अंतिम किंवा शेवटचा नाही. या प्रकरणात मोठा संशय असून हे कोणी करायला लावले की स्वतःहून झाले, हे तपासल्याशिवाय मी अधिक बोलणार नाही. पण आम्ही या



निर्णयाविरोधात वरिष्ठ पातळीवर अपील करणार आहोत. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कायदेशीर लढाईत आमचा फॉर्म अपीलमध्ये शंभर टक्के मंजूर होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# परतीची वाट सोपी व्हावी...




देशातला हुंडा प्रतिबंधक कायदा बराच जुना, १९६१ मधला. त्याला जोडून २००६ मध्ये घरगुती हिंसाचारविरोधी कायदाही आला. तरीही देशात दर वर्षी तब्बल ५,७०० तरुणींना हुंड्यापायी प्राण गमवावे लागतात. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्यूरो च्या आकडेवारीनुसार देशात दररोज २० महिला हुंडाबळी ठरतात; म्हणजे घटना सुरूच आहेत, वृत्तमाध्यमांची प्राथमिकता बदलली आहे इतकंच... शिक्षण आणि संपन्नतेचा हुंड्याच्या प्रथेशी संबंध नाही, हे पूर्वीही अनेकदा दिसलं होतं. अलीकडे गाजलेल्या पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणात हे सिद्ध झालंच होतं, त्विशा शर्मा प्रकरणाने जणू त्यावर शिक्कामोर्तब झालं. या प्रकरणातील आरोपी, त्विशा हिचा पती स्वतः वकील आहे. तिची सासू गिरिबाला सिंह माजी जिल्हा न्यायाधीश आहेत. उच्च शिक्षण, गडगंज संपत्ती किंवा प्रतिष्ठित पदं असली, तरी माणसाची हुंड्याची हाव मात्र कमी होत नाही, हे आपल्या समाजाचं कटू सत्य. एके काळी सोनं, रोकड, मोटार, दुचाकी, टीव्ही, फ्रिज यांसारख्या घरगुती वस्तू अर्स हुंड्याचं स्वरूप होतं. हे सगळं आजही हवं असतंच; पण आता हुंडाबहाद्दरांमध्ये आणखी स्मार्टनेस आला आहे. लग्नानंतर कमावत्या मुलीचे बँक अकाउंट्स, तिचे फिक्स्ड डिपॉझिट्स आणि तिच्या पगारावर यांचा डोळा असतो. त्विशाच्या प्रकरणात २० लाखा रुपयांच्या एफडीची मागणी झाली होती. आजही मुलाची नोकरी, पगार आणि पदावर हुंड्याचा रेट ठरतो. पगाराची मोठमोठी पॅकेजेस घेणाऱ्या तरुणांना हुंड्याचं पॅकेजही मोठंच हवं असतं. ते तो आपला हक्क समजतात. हुंडा किती मिळाला, यावरून समाजात त्यांची पत अन् प्रतिष्ठा ठरते. हुंडा देण्याची ऐपत असो वा नसो, कर्ज काढू, शेती विकू, पण मुलीचं सासर बडं असायला हवं, म्हणजे ती सुखी होईल, हे भ्रम आजही आहेत. प्रतिष्ठित घराणं, पदं, राजकीय मंडळींशी संबंध हे सगळं आवर्जून पाहिलं जातं; पण समाजात बडेजाव मिरवणारे हे लोक माणूस म्हणून किती हीन असू शकतात हे वैशाली हगवणे, त्विशा शर्मा या प्रकरणांतून समोर आलं. त्विशाची सासू माजी न्यायाधीश असल्याने सुरुवातीला एफआयआर दाखल करायला उशीर झाला. यंत्रणांनी आरोपींना वाचवण्याचे अटोकाट प्रयत्न केले. आरोपी प्रभावशाली असतील तर ते पोलिसांवर दबाव आणून किंवा पुराव्यांशी छेडछाड करून कायद्याच्या कचाट्यातून सुटण्याचा प्रयत्न करतात, हे अशा प्रकरणांत हमखास दिसतं. अनेकदा छळ शारीरिक नसतो, तर मानसिक असतो. अशा प्रकरणांमध्ये मानसिक छळ सिद्ध करणं कठीण असतं. कारण हा छळ घराच्या चार भिंतींआड होतो. ठोस डिजिटल किंवा आर्थिक पुराव्यांशिवाय केवळ तोंडी आरोपांवर न्यायालयात गुन्हा सिद्ध होण्याचं प्रमाण अत्यंत कमी आहे, यात आश्चर्य नाही. अलीकडे अशा प्रकरणात पीडित मुलीचे चारित्र्यहनन हाच बचाव ठरतोय. आरोपींकडून कायदेशीर बचावासाठी मुलीलाच मानसिक आजारी, व्यसनी, बदचलन ठरवण्याचा प्रयत्न केला जातो. पीडित मुली यामुळे सहानुभूती गमावतात. कायदेशीर प्रक्रियेतही लक्ष मुख्य मुद्द्यावरून भरकटते. मुलगी शिकली प्रगती झाली तरी ती उंबरठ्याच्या बाहेर ! एकदा का ती घरात आली की तिचे कर्तृत्व शून्य. ती सासरच्यांच्या आणि पतीच्या मर्जीनुसार वागते की नाही, हे महत्त्वाचं. तिच्या स्वावलंबनाचा आदर अपवादानेच दिसतो. त्यामुळे त्विशा शर्मासारखी प्रकरणं ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसतात, तर संपूर्ण भारतीय समाजाच्या सडलेल्या मानसिकतेचा आरसा ठरतात. हे निर्वावलेपण इतकं आहे की अशा समाजातील गुन्हेगारांना कायदा शिक्षा देऊ शकतो, पण गुन्हे घडतच राहतात.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन

## शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा : घोषणांनी जंतर-मंतरचा परिसर दणाणला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

'नीट' परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्द्यावरून 'कॉकरोच जनता पार्टी'ने शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले. सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पाच दिवसांच्या आत राजीनामा द्यावा, अशी मागणी केली; तसे न केल्यास पुढील शनिवारी पुन्हा जंतर-मंतरवर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. सरकारविरोधी घोषणांनी जंतर-मंतरचा परिसर दणाणून गेला.

या आंदोलनात देशभरातून आलेले हजारो आंदोलक सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी आणि तरुणांची संख्या मोठी होती. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आणि या गैरप्रकाराच्या विरोधात न्याय मागण्यासाठी काही ज्येष्ठ नागरिकही आपल्या पाल्यांसह या आंदोलनात खांद्याला खांदा लावून उभे आहेत. या आंदोलनाची हाक 'कॉकरोच जनता पार्टीचे' संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिली होती. ते शनिवारी सकाळीच अमेरिकेहून दिल्लीत परतले. ते विमानतळावरून थेट जंतर-मंतर येथील आंदोलनस्थळी पोहोचले होते. परीक्षांमधील या गोंधळामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असून, केंद्र सरकारने आणि शिक्षणमंत्र्यांनी याची जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात आली आहे.



देशातील तरुण आता घाबरणार नाहीत, ते लढा देतील. झुरळेही घाबरत नाहीत आणि ती कधी मरतही नाहीत, असे अभिजीत दिपके यांनी जंतर-मंतर येथील आंदोलकांना संबोधित करताना म्हटले.

आंदोलनकर्त्यांनी सरकारसमोर पाच प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. सर्वप्रथम, शिक्षण क्षेत्रातील वादग्रस्त घडामोडी आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी त्यांची मागणी आहे. तसेच, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण व पायाभूत सुविधा उपलब्ध करून न देता घाईघाईने डिजिटल शिक्षणाची अंमलबजावणी करू नये, असेही आंदोलनकर्त्यांचे मत आहे. मणिपूरमधील अस्थिर परिस्थितीमुळे विस्कळीत झालेली शिक्षण व्यवस्था तातडीने पूर्ववत करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय, विविध स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता, निष्पक्षता आणि विश्वासार्हता कायम राखून विद्यार्थ्यांचा परीक्षाप्रक्रियेवरील विश्वास अबाधित ठेवावा, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांवर वाढत असलेला शैक्षणिक ताण आणि त्याचे मानसिक परिणाम लक्षात घेता, त्यांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन आवश्यक समुपदेशन व सहाय्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## शिवराज्याभिषेक हाच भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन ; संभाजीराजेंची भावनिक साद : रायगडावर शिवसागर

**पुणे/वृत्तसंस्था**

रायगडावर 6 जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या 352 व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा उत्साहपूर्ण जल्लोष पाहायला मिळाला. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि शिवभक्त रायगडावर दाखल झाल्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. महाराजांच्या जयघोषाने गड दुमदुमून गेला असून विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक 6 जून 1674 रोजी याच रायगडावर पार पडला होता. यावेळी छत्रपती संभाजीराजे यांनी रायगडावर उपस्थित राहून शिवभक्तांना संबोधित केले. शिवराज्याभिषेक हाच भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन अशा भावनिक शब्दांत छत्रपती संभाजीराजे यांनी साद घातली.

संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांच्या उत्साहाचे कौतुक केले. रायगडावर जमलेल्या जनसमुदायाचा उल्लेख करताना त्यांनी, हा केवळ जनसागर नाही, तर शिवसागर आहे, असे म्हटले. रायगडावर मर्यादित सुविधा असतानाही हजारो शिवभक्त अनेक दिवसांपासून मुक्काम करून या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात, याबद्दल त्यांनी विशेष गौरव केला. राहण्याची, जेवणाची आणि इतर सुविधांची कमतरता असूनही शिवभक्त मोठ्या श्रद्धेने रायगडावर येतात, हेच



महाराजांविषयीचे प्रेम आणि निष्ठा दर्शवते, असे त्यांनी नमूद केले. संभाजीराजे पुढे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून गडावर मुक्काम करणाऱ्या शिवभक्तांचे समर्पण पाहून ते स्वतःही भावूक झाले आहेत. रात्रीची व्यवस्था, दैनंदिन गरजा आणि अनेक अडचणी असूनही हजारो लोक फक्त छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करण्यासाठी येथे दाखल झाले आहेत. 300 वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही एखाद्या राजासाठी अशी भावना आणि श्रद्धा कायम राहणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. आपण महाराजांचे रक्ताचे आणि विचारांचे वारसदार आहोतच, पण या शिवभक्तांनाही वंदन करण्यासाठी आपण येथे आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## 'ही लढाई थांबणार नाही' ; अभिजीत दिपकेंचा सरकारला इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमिततेविरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारला सात दिवसांची मुदत दिली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा किंवा त्यांना पदावरून हटवावे, अन्यथा हे आंदोलन देशव्यापी करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. "ही लढाई इथेच संपत नाही," असेही दिपके यांनी स्पष्ट केले.

रविवारी सोशल मीडियावर पोस्ट करत दिपके यांनी आंदोलनात सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानले. त्यांनी या आंदोलनाला ऐतिहासिक आणि शांततापूर्ण लोकचळवळ असे म्हटले. त्यांनी म्हटले आहे की, काल आपल्यापैकी हजारो जणांनी इतिहास घडवला. जंतरमंतरवरील आपल्या शांततापूर्ण निदर्शनांनी सरकारला याची झलक दाखवून दिली की, जेव्हा आपण 'झुरळं' एकवटतो तेव्हा काय करू शकतो. अनेक जण प्रथमच आंदोलनात सहभागी झाले असून शिक्षण व्यवस्थेबाबतचा रोष व्यक्त करण्यासाठी ते रस्त्यावर उतरल्याचे त्यांनी सांगितले.

उन्हाच्या तडाख्याची पर्वा न करता सहभागी झालेल्या आणि शांततापूर्ण निदर्शने हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे हे सिद्ध करणाऱ्या तुम्हा प्रत्येकाचे मी आभार मानतो. शांततापूर्ण चळवळीचे सरकार काहीही वाकडे करू शकत नाही. आपल्यासारख्या 'झुरळांना' त्यांच्याकडून कधीही घाबरण्याची गरज नाही. पण हे प्रकरण इथेच संपत नाही. धर्मेंद्र प्रधान यांनी एका संपूर्ण पिढीवर अन्याय केला आहे. जर त्यांना पदावरून हटवले नाही किंवा त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला नाही, तर आम्हाला आमचा लढा प्रत्यक्ष रस्त्यावर सुरू ठेवावा लागेल, असे दिपके यांनी म्हटले आहे.

## घरगुती गॅसच्या दरात 29 रुपयांनी वाढ; मोदी हे महागाई पुरुष : काँग्रेस

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सर्वसामान्यांना आणखी एक धक्का बसला आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात पुन्हा वाढ करण्यात आली असून आता स्वयंपाकघराचा खर्च वाढणार आहे. सरकारी तेल कंपन्यांनी 14.2 किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत 29 रुपयांची वाढ जाहीर केली आहे. नव्या दरांची अंमलबजावणी तत्काळ करण्यात आली आहे.

या दरवाढीनंतर देशातील प्रमुख महानगरांमध्ये गॅस सिलेंडरचे दर नव्या पातळीवर पोहोचले आहेत. दिल्लीत घरगुती गॅस सिलेंडरची किंमत 942 रुपयांवर गेली आहे. कोलकात्यात ग्राहकांना आता 968 रुपये मोजावे लागणार आहेत. मुंबई आणि पुण्यात सिलेंडरचा दर 941.50 रुपये झाला असून चेन्नईमध्ये तो 957.50 रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढत असताना आता घरगुती गॅसही महागल्याने सर्वसामान्य



कुटुंबांच्या मासिक बजेटवर अतिरिक्त ताण येणार आहे. विशेषतः मध्यमवर्गीय आणि कमी उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी ही वाढ चिंतेची बाब मानली जात आहे.

घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ केल्यामुळे विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. आधीच महागाईचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकल्याचा आरोप काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसने सरकारवर केला आहे. दरवाढीनंतर काँग्रेसने पुन्हा एकदा 'महागाई पुरुष मोदी' म्हणत सरकारवर टीका केली. पक्षाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टमध्ये लिहीले आहे की, "महागाई पुरुष मोदी यांनी पुन्हा एकदा महागाईचा बडगा उगारला आहे. आता घरगुती गॅस सिलिंडर २९ रुपयांनी महाग झाला आहे. मोदींचे सूत्र स्पष्ट आहे, जनतेकडून पैसे उकळायचे आणि आपल्या श्रीमंत मित्रांच्या तिजोऱ्या भरायच्या."

# सातबाऱ्यावर नाव नोंदणीसाठी घेतली लाच; महसूल अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडलं

■ अंबरनाथ/वृत्तसंस्था

तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी ईश्वर जाधव (Ambernath Revenue Officer Ishwar Jadhav) यांना २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB ) रंगेहात पकडल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून शुक्रवारी करण्यात आलेल्या या कारवाईमुळे नागरिकांच्या हक्काच्या कामांसाठीही लाचेची मागणी होत असल्याचे वास्तव समोर आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या वडिलांच्या निधनानंतर वारस म्हणून सावत्र बहिणीचे नाव सातबारा उताऱ्यावर नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. हे काम पूर्ण करून देण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी ईश्वर जाधव यांनी स्वतःसाठी १० हजार रुपये आणि मंडळ अधिकाऱ्यासाठी १० हजार रुपये अशी एकूण २० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदाराने ठाणे एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीने संपूर्ण प्रकरणाची पडताळणी केली. चौकशीत लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी सापळा रचला. त्यानुसार द्वारली येथील तलाठी कार्यालयात तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना ईश्वर जाधव यांना रंगेहात अटक करण्यात आली. कारवाईदरम्यान लाचेची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली असून त्यांचा मोबाईल फोनही तपासासाठी ताब्यात घेण्यात आला आहे. याशिवाय त्यांच्या राहत्या घराची झडतीही घेण्यात आली.

या घटनेनंतर महसूल विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथ तालुक्यात सातबारा आणि फेरफार नोंदणीची अनेक कामे प्रलंबित असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून कामांमध्ये होत असलेल्या विलंबामुळे नाराजी वाढली आहे. दरम्यान, या प्रकरणी हिल लाईन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास ठाणे एसीबीकडून करण्यात येत आहे.

## कॅन्सर रुग्णालयाच्या सर्व्हरवर सायबर अटॅक; हॅकर्सकडून खंडणीची मागणी

■ चंद्रपूर/वृत्तसंस्था

शहरातील कॅन्सर केअर फाउंडेशनच्या मेन सर्व्हरवर सायबर अटॅक करण्यात आला आहे. हॅकर्सनी रुग्णालयाचा महत्त्वाचा डेटा लीक करून खंडणी मागितल्याने वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे रुग्णालयाच्या कामकाजावर परिणाम झाला असून रुग्णांच्या माहितीच्या सुरक्षेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ जून रोजी सकाळच्या सुमारास रुग्णालयाच्या आयटी विभागाला मुख्य सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे आढळले. सुरुवातीला किरकोळ असल्याचे वाटत होते. मात्र, तपासणी केल्यानंतर सर्व्हरवर रॅन्समवेअरचा धमकीचा मेसेज दिसून आला. त्यानंतर अज्ञात सायबर गुन्हेगारांनी रुग्णालयाच्या डिजिटल यंत्रणेत घुसखोरी करून संपूर्ण डेटा एन्क्रिप्ट केल्याचे स्पष्ट झाले. या सायबर हल्ल्यामुळे हॉस्पिटल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट सिस्टीम (HIMS) पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी रुग्णांची माहिती, उपचारांशी संबंधित नोंदी, तसेच प्रशासनाशी संबंधित अनेक महत्त्वाची माहिती तात्पुरती लॉक करण्यात आली आहे. त्यामुळे डॉक्टर, कर्मचारी आणि रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. हॅकर्सनी सर्व्हरवर केलेल्या मेसेजमध्ये खंडणीची रक्कम बिटकॉईनच्या स्वरूपात भरण्याची मागणी केली आहे.

मागितलेली रक्कम भरल्यानंतरच डेटा अनलॉक करण्यासाठी आवश्यक 'डिक्रिप्शन की' दिली जाईल, अन्यथा संपूर्ण डेटा कायमस्वरूपी डिलीट केला जाऊ शकतो, अशी धमकीही देण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच रुग्णालय प्रशासनाने तत्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधला. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेमुळे चंद्रपूरसह राज्यातील इतर रुग्णालयांच्या सायबर सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## कल्याणमध्ये गोळीबार; धक्कादायक कारण उघड

**कल्याण :** व्हॉट्सॲप डीपी आणि स्टेटसवर फोटो ठेवण्याच्या किरकोळ कारणावरून कल्याणमध्ये गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका तरुणावर गोळीबार करण्यात आला. त्यानंतर मुख्य आरोपीने स्वतःवरही गोळी झाडून घेतल्याची माहिती समजते. खडकपाडा पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. तर मुख्य आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे.

कल्याण पश्चिमेतील मोहने परिसरात राहणाऱ्या अभिषेक पवार उर्फ अभी आणि गौरव साळुंखे यांच्या गटामध्ये जुना वाद होता. २६ मे रोजी तरुणांच्या दोन्ही गटांमध्ये वाद झाला होता अशी माहिती समोर आली आहे. पाटीलनगर परिसरात राहणाऱ्या मोनू फुलोरे या तरुणाने गौरव साळुंखेसोबतचा फोटो व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवला होता. हा फोटो पाहून अभिषेक पवार प्रचंड चिडला. शुक्रवारी रात्री तो आपल्या दहा ते बारा साथीदारांसह मोनू फुलोरेचा शोध घेत पाटीलनगरमध्ये पोहोचला. अभिषेक आणि त्याच्या साथीदारांना पाहताच मोनू फुलोरे आणि त्याचा भाऊ तेथून पळून गेले.

## नोकरीचं आमिष देत शिक्षिकेचं धर्मांतर, हॉटेलमध्ये नेत केले अत्याचार

■ छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था

नाशिकमधील 'कॉर्पोरेट धर्मांतर' प्रकरण ताजे असतानाच छत्रपती संभाजीनगरातूनही एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दुबईमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका खासगी शिक्षकाने ४३ वर्षीय विवाहित शिक्षिकेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. धक्कादायक म्हणजे धर्मांतर करून महिलेवर अत्याचार करण्यात आले आणि त्यानंतर आरोपी महिलेचे पैसे, दागिने घेऊन पळाला. याप्रकरणी पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला एका खासगी शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. त्याच शाळेत आरोपी हुसेन अबु सोयदान (वय ४५) शिक्षक म्हणून काम करत होता. एकाच ठिकाणी नोकरी करत असल्यामुळे दोघांमध्ये ओळख झाली आणि त्यातून मैत्री वाढली. या ओळखीचा फायदा घेत आरोपीने पीडितेला परदेशात नोकरीची संधी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. महिलेने केलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने पीडितेला तिच्या पतीपासून दूर जाण्यास प्रवृत्त केले. तसेच तिच्याशी लग्न करून एकत्र राहण्याची इच्छा व्यक्त करत तिला जाळ्यात ओढले. त्यानंतर शहरातील एका हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दुबईत नोकरी मिळवण्यासाठी धर्मांतर आवश्यक असल्याचे सांगून आरोपीने तिच्यावर दबाव टाकला. तिचे मनपरिवर्तन करून तिला धार्मिक विधी आणि कलमा पठण करण्यास भाग पाडल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपीने कारणे सांगून पीडितेकडून मोठी रक्कम उकळली. ऑनलाइन व्यवहारांसह रोख रक्कम आणि सुमारे सहा तोळे सोने घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दुबईतील नोकरी, पासपोर्ट प्रक्रिया आणि इतर खर्चाचे कारण देत ही रक्कम उकळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, पैसे आणि दागिने मिळाल्यानंतर आरोपीने संपर्क तोडल्याचा आरोप आहे.

# बेपत्ता कुख्यात गुंडाची हत्या, गटारात आढळला मृतदेह

■ नालासोपारा/वृत्तसंस्था

नालासोपारा पूर्वेतील वैतिवाडी परिसरातील एका ड्रेनेजमधून मानवी सांगाडा आढळून आला आहे. पोलीस तपासात तो सांगाडा गेल्या पाच महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या कुख्यात गँगस्टर रवि बिडलान याचा असल्याची प्राथमिक ओळख पटली आहे. या प्रकरणी आचोळे पोलिसांनी पाच जणांविरोधात कट रचून हत्या करणे आणि पुरावे नष्ट केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी आरोपींच्या एका दारू पार्टीदरम्यान रवि बिडलान याच्या हत्येबाबत चर्चा झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान संशयितांकडे चौकशी केल्यानंतर पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. त्यानंतर वैतिवाडी परिसरातील ड्रेनेज चेंबरची पाहणी करण्यात आली असता तिकडून मानवी सांगाडा आणि काही फाटलेले कपडे पोलिसांनी ताब्यात घेतले. घटनास्थळी सापडलेल्या कपड्यांची ओळख रवि बिडलान याच्या पत्नीने केली. डीएनए तपासणीसाठी नमुने पाठवण्यात आले असून, अहवालानंतर अधिकृत पुष्टी होणार आहे. या प्रकरणात सुमित आझाद सालासार उर्फ 'बा' याला अटक करण्यात आली आहे. तसेच रोहन संजय जगदाळे उर्फ 'टायगर' याच्यासह अन्य तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

आरोपींनी कट रचून रवि बिडलान यांची हत्या केल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो ड्रेनेज चेंबरमध्ये टाकल्याचा पोलिसांना संशय आहे.

रवि बिडलान हा परिसरातील कुख्यात गुन्हेगार म्हणून ओळखला जात होता. त्याच्याविरोधात खुनाचा प्रयत्न, खंडणी, दरोडा, लूटमार, बलात्कार, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे आणि मारहाण यांसारखे डझनभर गंभीर गुन्हे दाखल होते. तसेच गेल्या वर्षी त्याला पाच जिल्ह्यांतून तडीपार करण्यात आले होते. ही हत्या का करण्यात आली? याचं नेमकं कारण समोर आलं नसून पोलीस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे नालासोपारा परिसरात खळबळ उडाली असून, तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अय्यरकडे टी-20 संघाचे नेतृत्व; सूर्यकुमार बाहेर, वैभव सूर्यवंशीला भारताकडून पहिली संधी

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी आयर्लंड, इंग्लंड दौरा आणि जपानमधील आशियाई खेळांसाठी अचानक टी-२० संघाची घोषणा केली आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील क्रिकेट हाऊस येथे झालेल्या बैठकीत याबद्दल निर्णय घेण्यात आले. नुकताच भारताला २०२६ चा टी-२० विश्वचषक जिंकून देणारा कर्णधार सूर्यकुमार यादव याला मोठा धक्का देत निवड समितीने संघाची धुरा थेट श्रेयस अय्यरकडे सोपवली आहे.

डिसेंबर २०२३ पासून भारतीय टी-२० संघातून बाहेर असलेल्या श्रेयस अय्यरने थेट कर्णधार म्हणूनच संघात पुनरागमन केले आहे. निवड समितीने अय्यरच्या नेतृत्व कौशल्यावार आणि अनुभववर विश्वास दाखवला. मधल्या फळीत डाव सावरणारा आणि दबावाच्या परिस्थितीत धावांची गती कायम ठेवणारा हुकमी खेळाडू म्हणून



श्रेयसकडे पाहिले जात आहे. आयपीएलमधील त्याचे उत्कृष्ट नेतृत्व आणि फॉर्मचा फायदा भारतीय संघाला आगामी काळात होईल, असा विश्वास निवडकर्त्यांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे, विश्वविजेता कर्णधार सूर्यकुमार यादवला त्याच्या खराब कामगिरीमुळे संघातून विश्रांती देण्यात आल्याचे समजते.

या संघ निवडीतील सर्वात ऐतिहासिक आणि कौतुकास्पद निर्णय म्हणजे १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा भारतीय संघात झालेला समावेश. आयपीएल २०२६ च्या एकाच हंगामात ७२ षटकार ठोकणारा आणि २३७.३० चा चक्रावून टाकणारा स्ट्राईक रेट राखणाऱ्या वैभवला बीसीसीआयने थेट आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे तिकीट दिले आहे. आयर्लंड दौऱ्यातील २६ जून रोजी पहिला टी-२० आणि २८ जून रोजी दुसरा टी-२० बेलफास्ट येथे खेळण्यात येईल. तर इंग्लंड दौऱ्यातील ०१ जुलै ते ११ जुलै दरम्यान ५ सामन्यांची मालिका चेस्टर-ली-स्ट्रीट, मँचेस्टर, नॉटिंगहॅम, ब्रिस्टल, साऊदॅम्पटन येथे खेळण्यात येईल.

**आयर्लंड व इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ** : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी.

**आशियाई क्रीडा स्पर्धा (जपान) भारतीय संघ :** श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, वैभव सूर्यवंशी.

### आशियाई खेळांसाठी मोठी योजना..

बीसीसीआयने यावर्षी जपानमध्ये होणाऱ्या २०२६ च्या आशियाई खेळांसाठीही आपल्या योजना निश्चित केल्या आहेत. यासाठी संघाची घोषणाही करण्यात आली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, चीनमध्ये झालेल्या मागील आशियाई खेळांमध्ये ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले होते. यावेळी, बीसीसीआय आपले सुवर्णपदक टिकवण्यासाठी आशियाई खेळांमध्ये एक मजबूत आणि युवा संघ पाठवत आहे.

# फॅबिओ कोबोली पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमच्या अंतिम फेरीत; प्रतिस्पर्धी अर्नाल्डीची आजारपणामुळे माघार

**पॅरिस/वृत्तसंस्था**

इटलीच्या फॅबिओ कोबोलीने कारकिर्दीत पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. फ्रेंच ओपन २०२६ च्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीपूर्वी त्याचा प्रतिस्पर्धी माटेओ अर्नाल्डीने आजारपणामुळे माघार घेतली, ज्यामुळे कोबोलीला वॉकओव्हर मिळाला. १० व्या मानांकित कोबोलीचा सामना आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होईल. झ्वेरेव्हने चेक रिपब्लिकच्या याकूब मेन्सिकाला हरवले. या विजयासह त्याने कारकिर्दीत दुसऱ्यांदा रोलँ गॅरोसच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले. इटलीचा माटेओ अर्नाल्डी व्हायरल इन्फेक्शन त्याच्या कारकिर्दीतील पहिल्या ग्रँड स्लॅम उपांत्य फेरीत खेळू शकला नाही.



उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या फॅबियो कोबोलीने चौथ्या मानांकित फेलिक्स ऑगर-एलियासिमेला चार सेटपर्यंत चाललेल्या अटीतटीच्या सामन्यात हरवून उपांत्य फेरीत स्थान मिळवले होते. उपांत्य फेरीत त्याचा सामना अर्नाल्डीशी होणार होता, परंतु वॉकओव्हर मिळाल्याने तो थेट अंतिम फेरीत पोहोचला आहे. माटेओ अर्नाल्डी उपांत्यपूर्व फेरीत वॉकओव्हर मिळवून इथपर्यंत पोहोचला होता. कोर्ट फिलिप-चॅटियरवर खेळल्या गेलेल्या सामन्यात इटलीचा माटेओ बेरेटिनी ५-७, २-५ असा पिछाडीवर होता, तेव्हा त्याने दुखापत किंवा इतर कारणांमुळे सामना अर्धवट सोडला होता. पण उपांत्य फेरीत आजारपणामुळे अर्नाल्डीला बाहेर पडावे लागले.

झ्वेरेव्ह आणि मेन्सिका यांच्यातील दुसरी उपांत्य फेरी चार सेटपर्यंत चालली. झ्वेरेव्हने २० वर्षीय याकूब मेन्सिकाला ७-५, ६-२, ३-६, ६-३ ने हरवले. त्याने पहिले दोन सेट सहज जिंकले, पण तिसऱ्या सेटमध्ये मेन्सिकाने ६-३ ने विजय मिळवला. तरीही, झ्वेरेव्हने चौथा सेट ६-३ ने जिंकून रविवारच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले.

# विराट कोहलीच्या जागी यशस्वी जैस्वालचा संघात समावेश

**मुंबई/वृत्तसंस्था**



विराट कोहली अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी अधिकृतपणे जाहीर केले की, विराट कोहलीच्या जागी युवा सलामीवीर यशस्वी जैस्वालचा एकदिवसीय संघात समावेश करण्यात आला आहे. जैस्वाल सध्या मुल्लानपूर येथे अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूर आणि गुजरात टायटन्स यांच्यातील रोमांचक आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यादरम्यान विराट कोहलीला दुखापत झाली.

कोहलीला पूर्णपणे बरे होण्यासाठी अंदाजे सहा आठवड्यांचा कालावधी लागेल, ज्यामध्ये बंगळूरु येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसनाचा समावेश असेल. त्याने मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयातील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. दिनशॉ परडीवाला यांच्याशी टेलिकन्सल्टेशनद्वारे संवाद साधला आहे, ज्यांनी त्याच्या एमआरआय स्कॅनची तपासणी केली. वृत्तानुसार, कोहलीला दुखापतीतून पूर्णपणे बरे होण्यासाठी केवळ अफगाणिस्तान मालिकाच नव्हे, तर त्यानंतर इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिकाही मुकावी लागू शकते.

# नॉर्वे चेस विजेतेपद जिंकणारा प्रज्ञानानंदा पहिला भारतीय खेळाडू; फायनलमध्ये जर्मनीच्या विन्सेंटला हरवले

**ओस्लो/वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाने इतिहास रचत नॉर्वे चेस २०२६ चे विजेतेपद पटकावले आहे. २० वर्षीय प्रज्ञानानंदा हा टूर्नामेंट जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. अंतिम फेरीत त्याने जर्मनीच्या विन्सेंट कीमरला हरवून ही कामगिरी केली. टूर्नामेंटच्या शेवटच्या दिवशी प्रज्ञानानंदा १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर होता. त्याने क्लासिकल सामना जिंकून ३ गुण मिळवले आणि एकूण १८ गुणांसह विजेतेपद पटकावले.

स्पर्धेच्या शेवटच्या फेरीत अमेरिकन ग्रँडमास्टर वेस्ली सो १५.५ गुणांसह अव्वल स्थानी होते. पण त्यांची लढत बरोबरीत सुटली आणि निर्णय आर्मगेडन टायब्रेकरमध्ये गेला. यामुळे प्रज्ञानानंदासाठी विजेतेपद जिंकण्याचा मार्ग मोकळा झाला. वेस्ली सो यांनी टायब्रेकर जिंकला, पण त्यांना फक्त १.५ गुण मिळाले. अशा प्रकारे त्यांचे एकूण १७ गुण झाले, जे प्रज्ञानानंदापेक्षा एक कमी होते.

फ्रान्सचे अलीरजा फिरोजा १५.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिले. शेवटच्या फेरीत मॅग्नस कार्लसनने गुकेशला हरवले, पण तेही विजेतेपद जिंकू शकले नाहीत. कार्लसन १३ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिले. या स्पर्धेच्या सुरुवातीच्या फेरीत प्रज्ञानानंदाची कामगिरी सामान्य होती, पण नंतरच्या लढतींमध्ये त्यांनी शानदार पुनरागमन केले. त्यांच्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक म्हणजे वर्ल्ड नंबर-१ आणि सात वेळा नॉर्वे चेस चॅम्पियन मॅग्नस कार्लसनला दोनदा क्लासिकल लढतींमध्ये हरवणे. प्रज्ञानानंदाने ते करून दाखवले जे भारतीय बुद्धिबळाचे दिग्गज विश्वनाथन आनंदही करू शकले नव्हते. प्रज्ञानानंदा दुसऱ्यांदा नॉर्वे चेसमध्ये खेळत होता.



# स्त्रिया व पुरुषांकडे आजही वेगळ्या दृष्टीने पाहिले जाते; माधुरीची टीका



माधुरी दीक्षित सध्या 'मा बहन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे, ज्यामध्ये ती तृप्ती डिमरीसोबत मुख्य भूमिकेत आहे. लोकांना त्यांची जोडी खूप आवडत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. दरम्यान, या अभिनेत्रीने आता समाजाच्या पुरुषप्रधानतेच्या संकल्पनेवर टीका केली आहे. तिने म्हटले आहे की, स्त्रिया आणि पुरुषांकडे आजही वेगळ्या दृष्टीने पाहिले जाते.

माधुरी म्हणाली की, प्रेम आणि नातेसंबंधांच्या बाबतीत समाज अजूनही दुटप्पी भूमिका घेतो. हा एक पुरुषप्रधान समाज आहे. सुरुवातीपासूनच हे असेच आहे. जर एखाद्या पुरुषाला गर्लफ्रेंड असेल, तर त्याला कॅसानोव्हा किंवा रोमियो म्हटले जाते. पण जर एखाद्या स्त्रीने तेच केले, तर तिला बदनाम केले जाते आणि तिच्याकडे नकारात्मक नजरेने पाहिले जाते.

अभिनेत्री म्हणाली की, तिचा 'माँ बहन' हा चित्रपट या जुन्या परंपरा आणि रूढींना आव्हान देतो. चित्रपटात साकारलेली पात्रे सदोष, गुंतागुंतीची आणि अगदी वास्तविक जीवनासारखी आहेत. हा चित्रपट सशक्त स्त्रिया आणि रूढ कल्पनांना झुगारून देणाऱ्या स्त्रियांचे चित्रण करतो. प्रत्येक स्त्रीला आदर आणि सन्मानाने जगण्याचा हक्क आहे, यावर तिने जोर दिला. या चित्रपटात आम्ही समाजाने घालून दिलेले प्रत्येक नियम मोडले आणि ते करताना आम्हाला खूप मजा आली. पात्रे गुंतागुंतीची आहेत, पण खूप खरी वाटतात. तुम्हाला त्यांच्याशी एकरूप झाल्यासारखे वाटेल.

या चित्रपटाचे दिग्दर्शन सुरेश त्रिवेणी यांनी केले आहे. माधुरी दीक्षितने यात रेखा नावाच्या आईची भूमिका साकारली आहे. ही कथा रेखाभोवती फिरते, जी आधीच अनेक अडचणींशी झगडत आहे. अचानक तिच्या स्वयंपाकघरात एक मृतदेह सापडतो. आपल्या दोन मुली, जबाबदार जया आणि स्पष्टवक्ती सुषमा यांच्यासोबत मिळून, ती पटकन विचार करते, खोटे बोलते आणि शेजाऱ्यांपासून सत्य लपवते, जेणेकरून या परिस्थितीचा सामना करता येईल.

## स्वप्नसुंदरीच्या टीझरने वाढवली प्रेक्षकांची उत्सुकता

लग्न, नातेसंबंध आणि योग्य जोडीदाराच्या शोधाभोवती फिरणारी कथा असलेला स्वप्नसुंदरी हा नवा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रेडबेल मीडिया आणि पॅनोरमा स्टुडिओज प्रस्तुत या चित्रपटाचा टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून त्याने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. कौटुंबिक मनोरंजन, विनोद आणि भावनिक नात्यांचा सुरेख संगम असलेला हा चित्रपट २४ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.



चित्रपटात अभिनेता भूषण प्रधान राघवही मध्यवर्ती भूमिका साकारताना दिसणार आहे. आपल्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे चॉकलेट बॉय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूषणला या चित्रपटात एका वेगळ्याच भूमिकेत पाहायला मिळणार आहे. त्याच्यासोबत अभिनेत्री सायली पाटील मानसीच्या भूमिकेत झळकणार असून या नव्या जोडीची केमिस्ट्री टीझरमधूनच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये राघवच्या लग्नासाठी सुरू असलेल्या मुलगी पाहण्याच्या प्रवासाची मजेशीर झलक पाहायला मिळते. योग्य जोडीदाराच्या शोधात असलेला राघव अनेक मुलींना भेटत असतो, मात्र त्याच्या मनात एका आदर्श जीवनसाथीचे चित्र कायम असते. या प्रवासात त्याच्या आयुष्यात मानसीची एंट्री होते आणि कथेला वेगळे वळण मिळते. मानसी आणि राघव यांच्यात प्रेम फुलेल का? तीच त्याच्या मनातील स्वप्नसुंदरी ठरेल का? याची उत्तरे मात्र चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच मिळणार आहेत

चित्रपटाचे दिग्दर्शक अक्षय जयसिंगराव शिंदे यांनी सांगितले की, आजच्या पिढीसाठी लग्न आणि योग्य जोडीदाराची निवड हा अत्यंत महत्वाचा, पण तितकाच गुंतागुंतीचा विषय बनला आहे. याच विषयाला हलक्या-फुलक्या आणि मनोरंजक पद्धतीने प्रेक्षकांसमोर मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. भूषण प्रधानने साकारलेला राघव अनेक तरुणांना स्वतःशी जोडून घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शिल्पा शिंदेच्या खोट्या लैंगिक छळ प्रकरणावर कारवाईची मागणी



भाभीजी घर पर है फेम अभिनेत्री शिल्पा शिंदेने 'भाभीजी घर पर है' चे निर्माते संजय कोहली यांच्या विरोधात लैंगिक छळाचा गुन्हा दाखल केला होता. मात्र, अलीकडेच या अभिनेत्रीने आपला गुन्हा खोटा असल्याचे कबूल केले. तेव्हापासून शिल्पा शिंदे वादात अडकली आहे. आता, एआयसीडब्ल्यूएने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या खोट्या लैंगिक छळाच्या प्रकरणासंदर्भात कठोर कारवाईची मागणी केली आहे.



हिना खानसह अनेक टीव्ही कलाकारांनीही शिल्पा शिंदेच्या खोट्या प्रकरणावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. दरम्यान, एआयसीडब्ल्यूएने इंस्टाग्रामवर एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. संघटनेने म्हटले आहे की, 'भाभीजी घर पर हैं' या मालिकेचे निर्माते संजय कोहली यांच्यावर लैंगिक छळाचा खोटा आरोप केल्याची शिल्पा शिंदेची कबुली संपूर्ण चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीसाठी चिंतेचा विषय आहे. एखाद्यावर लैंगिक छळाचा खोटा आरोप केल्याने त्यांच्या आयुष्यावर विनाशकारी परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम त्यांच्या प्रतिष्ठेवर, कुटुंबावर, मुलांवर, करिअरवर आणि अगदी मानसिक आरोग्यावरही होऊ शकतो. अशा आरोपांमुळे एखाद्या व्यक्तीची प्रतिमा कायमची खराब होऊ शकते. याचा परिणाम केवळ त्या व्यक्तीवरच नाही, तर त्यांच्या कुटुंबावर आणि प्रियजनांवरही होतो.

पुढे म्हटले आहे की, अशा घटनांमुळे खऱ्या तक्रारींबद्दलही लोकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते. यामुळे ज्यांनी खरोखरच छळ सहन केला आहे आणि ज्यांना न्याय हवा आहे, त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण होते. आपल्या निवेदनाच्या समारोपात, एआयसीडब्ल्यूएने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याचे आवाहन केले आहे. संस्थेने म्हटले आहे की, जर तपासात हे आरोप हेतुपुरस्सर खोटे असल्याचे सिद्ध झाले, तर कायद्यानुसार कठोर कारवाई केली पाहिजे. निरपराध लोकांना खोट्या आरोपांपासून वाचवणे आणि खऱ्या पीडितांना न्याय मिळवून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे.

***

## आक्षेपानंतर जान्हवीच्या भूमिकेवर दिग्दर्शकाची माफी

फिल्म पेद्दीमध्ये अभिनेत्री जान्हवी कपूरच्या अचियम्मा या भूमिकेवरून निर्माण झालेल्या वादामुळे दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी सार्वजनिकरित्या माफी मागितली आहे. सोशल मीडियावर प्रेक्षकांनी चित्रपटातील महिला पात्राच्या सादरीकरणावर आक्षेप घेतला होता, त्यानंतर दिग्दर्शकाने प्रतिक्रिया देत महिलांच्या सन्मानाबद्दल बोलले आणि वादग्रस्त दृश्यांमध्ये बदल करण्याची ग्वाही दिली.



एक चित्रपट निर्माता म्हणून, माझा विश्वास आहे की सिनेमाने लोकांचे मनोरंजन केले पाहिजे, त्यांना प्रेरणा दिली पाहिजे आणि त्यांच्याशी जोडले पाहिजे. त्याचा उद्देश कधीही कोणालाही अस्वस्थ करणे किंवा त्यांचा अपमान करणे नसावा. पेद्दीमधील काही दृश्यांवर आलेल्या प्रतिक्रिया आम्ही गांभीर्याने घेतल्या आहेत. मी नेहमीच महिलांचा आदर करत आलो आहे, मग त्या पडद्यावर असोत किंवा खऱ्या आयुष्यात. आमचा हेतू कधीही कोणत्याही स्त्री पात्राला चुकीच्या पद्धतीने दाखवण्याचा किंवा तिचा अपमान करण्याचा नव्हता. परंतु, जर चित्रपटाचा कोणताही भाग लोकांना असे वाटत असेल, तर आम्ही त्यांच्या भावनांचा आदर करतो, त्यांच्या चिंता समजून घेतो आणि यासाठी मनापासून माफी मागतो. असे त्यांनी म्हटले आहे.

खरं तर, पेद्दी चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर सोशल मीडियावर जान्हवी कपूरच्या अचियम्मा या भूमिकेबद्दल काही लोकांचे म्हणणे आहे की, कथेच्या गरजेऐवजी प्रेक्षकांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने ही भूमिका अधिक बोल्ड पद्धतीने सादर करण्यात आली आहे. यामुळे चित्रपट निर्मात्यांवर ऑनलाइन टीका होऊ लागली. मात्र, या संपूर्ण वादावर जान्हवी कपूरकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. अभिनेत्रीने या प्रकरणावर सार्वजनिकपणे कोणतेही विधान केलेले नाही.

# मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत कुस्ती खेळाडूंसाठी विभागीय निवड चाचणी १० जून रोजी

जनसंचलन/बुलढाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ङ्कमिशन लक्ष्यवेधङ्क या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्राची स्थापना विभागीय क्रीडा संकुल, अमरावती येथे करण्यात येत आहे. या केंद्रासाठी पात्र खेळाडूंची निवड करण्यासाठी १० जून २०२६ रोजी विभागस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील स्पर्धांमध्ये सहभागाची संधी तसेच वैद्यकीय विमा संरक्षण शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. निवड चाचणीसाठी पात्रता निकष : वयोमर्यादा : २५ वर्षांखालील मुले व मुली (३१ डिसेंबर २०२६ रोजी), महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदकप्राप्त अथवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग असलेले खेळाडू, गत दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यांकन केले जाईल, क्रीडा कौशल्य व शारीरिक तंदुरुस्ती चाचणीत पात्र ठरणे आवश्यक, शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. आवश्यक कागदपत्र: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र व पालकांचे संमतीपत्र. निवड चाचणीचे डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहावे. चाचणी दुपारी १२.०० वाजतापासून सुरु होईल. अधिक माहितीसाठी जितेंद्र भुयार(मो. ८६६८५४६९५१), अनिल इंगळे (मो. ९९७००७११७२) किंवा अनुप वानखडे (मो. ९८८१९८०२८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

# महाडीबीटीवरून कापूस उत्पादकता अभियानासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासनाच्या नव्या कापूस उत्पादकता अभियान(कपास क्रांती - ) योजनेला सन २०२६-२७ पासून पुढील पाच वर्षांसाठी मान्यता देण्यात आली असून, या अभियानांतर्गत देशात १२५ लाख गाठी कापूस उत्पादन आणि प्रतिहेक्टर ५५० किलो लिंट उत्पादकता साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या अभियानाअंतर्गत शेतकऱ्यांसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. यामध्ये सघन कापूस लागवड (), क्लोज स्पेसिंग (), एकात्मिक पीक उत्पादन () प्रात्यक्षिके, बायोचार युनिट तसेच कॉटन श्रेडर या बाबींचा समावेश आहे. सन २०२६-२७ साठी या योजनेअंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महा-डीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पीक प्रात्यक्षिके, बायोचार युनिट आणि कॉटन श्रेडर या घटकांचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे यांनी केले आहे. या योजनेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चात बचत आणि कापूस उत्पादकतेत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# खाजगी नोकरी इच्छुकांसाठी १० व ११ जून रोजी प्लेसमेंट ड्राइव्ह




जनसंचलन/बुलढाणा

जल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा यांच्या पुढाकाराने १० व ११ जून २०२६ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १० जून रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), बुलढाणा येथे, तर दि. ११ जून रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव येथे हा रोजगार मेळावा होणार आहे. या उपक्रमात टाटा मोटर्स, पुणे तसेच वन एशिया, खामगाव यांसारख्या नामांकित कंपन्यांनी त्यांच्या रिक्त पदांची अधिसूचना दिली असून, रोजगार इच्छुक उमेदवारांना थेट मुलाखतीद्वारे नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. मेळाव्यात कंपनी प्रतिनिधींकडून उमेदवारांच्या मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधीही मिळणार आहे. १० वी, १२ वी, आयटीआय आणि पदवीधर पुरुष व महिला उमेदवारांनी आपल्या सोयीनुसार बुलढाणा किंवा खामगाव येथील कोणत्याही एका ठिकाणी सकाळी १० वाजता आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे. उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र व गरजू उमेदवारांनी या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त श्री. जी. पी. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा यांच्या (०७२६२) २४२३४२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# आरोग्य विभागात समुपदेशनाद्वारे ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या पारदर्शक बदल्या

जनसंचलन/बुलढाणा

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील ४ हजार ५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया राज्य प्रशासनातील आदर्श उपक्रम ठरली आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय तसेच कौटुंबिक परिस्थितीचा विचार करून बदल्या करण्यात आल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, सचिव-२, आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांच्या प्रशासकीय नियोजनातून संपूर्ण प्रक्रियेचे बारकाईने नियोजन करण्यात आले. प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण आणि प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यात आली. राज्यातील छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, नागपूर, अकोला, नाशिक, कोल्हापूर, पुणे, लातूर आणि ठाणे या परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थांमध्ये १३ ते २३ मे २०२६ या कालावधीत समुपदेशन प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. बदली प्रक्रियेत परिचारिका संवर्गातील १ हजार ५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) संवर्गातील ८०८, कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९७, औषध निर्माण अधिकारी संवर्गातील १६० आणि प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गातील १४९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या निश्चित करण्यात आल्या. कर्मचारी संघटनांनीही या प्रक्रियेचे स्वागत करत पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

या प्रक्रियेत रिक्त पदे आणि बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संकेतस्थळ तसेच नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. राज्यस्तरीय निरीक्षकांची नियुक्ती करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात आल्याने प्रक्रियेबाबत विश्वास वाढला आणि कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाला वाव मिळाला नाही. आरोग्य विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया न्याय्य, विश्वासार्ह आणि कर्मचारीहिताची असल्याचे सांगितले. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श निर्माण केल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. यावर्षी बदली प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभल्याने बदल्या अधिक नियोजनबद्ध आणि पारदर्शकपणे पार पाडता आल्याची भावना संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी व्यक्त केली. सार्वजनिक आरोग्य विभागातील ही समुपदेशनाधारित बदली प्रक्रिया भविष्यातील कर्मचारी व्यवस्थापनासाठी दिशादर्शक ठरणार असून राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानली जात आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनाची तयारी; वृक्षारोपण अभियानाचे नियोजन



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी ३०० कोटी वृक्षारोपण मोहीम आणि हरित महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने सामाजिक वनीकरण विभाग, बुलढाणा यांच्या वतीने जिल्हास्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत जिल्ह्यातील वृक्षारोपणाची उद्दिष्टे, उपलब्ध रोपसाठा, लागवडीसाठी योग्य क्षेत्रांची निवड, विविध विभागांमधील समन्वय, जनसहभाग वाढविणे तसेच वृक्षसंवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनावर विशेष भर देण्याच्या सूचना केल्या. पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि जैवविविधता संवर्धनासाठी वृक्षारोपण मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश दिले. जिल्ह्यातील विविध विभागांकडे उपलब्ध असलेल्या जागांचा तपशील संकलित करून विभागनिहाय ङ्लँड बँकफ ३० जूनपर्यंत तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागांना दिल्या. बैठकीस सामाजिक वनीकरण विभाग व वन विभागाचे अधिकारी, उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाचे प्रतिनिधी, जिल्हा नियोजन अधिकारी, प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग), जिल्हा कृषी अधिकारी, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून जिल्ह्यातील वृक्षारोपणाचे उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. नागरिकांनीही या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बुलढाणा जिल्हा घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात आले.

# वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे पाटील यांचा जिल्हा दौरा



**जनसंचलन/बुलढाणा**

कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष(राज्यमंत्री दर्जा) ॲड निलेश हेलांडे पाटील हे गुरुवार व शुक्रवार दि. ११ व १२ जुन २०२६ रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार गुरुवार दि. ११ जुन रोजी रात्री ९ वाजता अमरावती येथून शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे आगमन व मुक्काम. शुक्रवार दि १२ जुन रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह येथून मोताळाकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता तहसिलदार, मोताळा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट. दुपारी १२ वाजता मोताळा येथून नांदुराकडे प्रयान. दुपारी १.३० वाजता तहसिलदार, नांदुरा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट. दुपारी २.३० वाजता साईनुसार अमरावतीकडे प्रयाण करतील.

# महाडीबीटीवरून कापूस उत्पादकता अभियानासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

: केंद्र शासनाच्या नव्या कापूस उत्पादकता अभियान(कपास क्रांती - ) योजनेला सन २०२६-२७ पासून पुढील पाच वर्षांसाठी मान्यता देण्यात आली असून, या अभियानांतर्गत देशात १२५ लाख गाठी कापूस उत्पादन आणि प्रतिहेक्टर ५५० किलो लिंट उत्पादकता साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या अभियानाअंतर्गत शेतकऱ्यांसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. यामध्ये सघन कापूस लागवड (), क्लोज स्पेसिंग (), एकात्मिक पीक उत्पादन () प्रात्यक्षिके, बायोचार युनिट तसेच कॉटन श्रेडर या बाबींचा समावेश आहे. सन २०२६-२७ साठी या योजनेअंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महा-डीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पीक प्रात्यक्षिके, बायोचार युनिट आणि कॉटन श्रेडर या घटकांचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे यांनी केले आहे. या योजनेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चात बचत आणि कापूस उत्पादकतेत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# देऊळगाव राजा शासकीय आयटीआय येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन्यता विभाग तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था देऊळगाव राजा येथे शैक्षणिक सत्र ऑगस्ट २०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विविध व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने दि. २१ जून २०२६ पर्यंत अर्ज भरून प्रवेश अर्ज शुल्क जमा करावे. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना वेळेत अर्ज भरून आपला प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण अथवा तांत्रिक समस्या उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला भेट देऊन मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे. कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराच्या वाढत्या संधी लक्षात घेता, इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या करिअरची भक्कम पायाभरणी करावी, असेही संस्थेकडून सांगण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८